Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 9 | March - 2016

भारतीय बालशिक्षणाचे आद्यप्रवर्तक श्री गिजुभाई बधेका



डॉ. संदेश वाघ
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रास्ताविक -

अनुताई वाघ यांनी ठाणे जिल्हयातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. अनुताईना हे समाजकार्य करण्यासाठी प्रेरणा देणा-या अनेक व्यक्ती आहेत. त्यातील दोन नावे आवर्जून घ्यावी लागतात ती म्हणजे गिजुभाई बधेका व ताराबाई मोडक हया होत. हयांच्या बालशिक्षणतील योगदानातून प्रेरणा घेवून अनुताईनी आपले समाजकार्य सुरु केले. गिजुभाई बधेका यांना बालशिक्षणात महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. त्यांना बालशिक्षणाचे भारतीय आद्यप्रवर्तक म्हटले जाते.

गिजुभाई बधेका -

बालशिक्षणाचे आद्यप्रवर्तक श्री गिजुभाई बधेका यांचा जन्म सौराष्ट्रातील इतिहासप्रसिध्द वल्लभीपूर या गावी १५ नोव्हेंबर १८८५ रोजी झाला. त्यांचे वडील श्री भवानीशंकर बधेका हे वकील होते. त्यांच्या आईचे नाव काशिबेन होते. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण बल्लभीपूर; हल्लीचे वळाद्ध येथे झाले. गिजुभाईच्या साहित्यात वळा येथील त्यांच्या बालपणीच्या अनेक आठवणी विखुरलेल्या आहेत. तेथील अनेक पुरातन शिवमंदिरे, गावाबाहेरचा सुंदर तलाव, तेथील घेलो नदी, बगीचा इत्यादी नैसर्गिक व मनुयनिर्मित सुंदर वातावरणाचे संस्कार गिजुभाईच्या मानसिक सत्रटीवर झालेले आहेत वनस्पती व प्राणी जीवनाच्या अभ्यासाची त्यांची आवड सत्रटी सौदर्यसंबधीची रसिकता, हिंडण्या फिरण्याचा त्यांचा शौक व साहसवत्रत्ती इत्यादी गोटींचे बीजारोपण वळा गावच्या वातावरणात झाले असले पाहिजे.[१]

शिक्षणाच्या क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी -

सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांचे पुढील शिक्षण भावनगरला झाले. कॉलेजच्या प्रथम वार्षिपर्यंतचे शिक्षण त्यांनी मामाकडे केले. कुटुंबाच्या अर्थिक परिस्थितीपुढे कॉलेजचे शिक्षण बंद करुन ते एका व्यापारी पेढीत नोकरीला लागले. दक्षिण आफ्रिकेतही त्यांनी नोकरी केली. नोकरीची मुदत संपताच ते भारतात परतले. त्यांनी वकिलीचा अभ्यास केला व वकिलीच्या परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम आले. गिजुभाईना प्रतिठा व पैसा या दोन्ही गोंटींचा लाभ झाला पण त्यांचे मन व्यवसायात रमले नाही.

गिजुभाईचा बालशिक्षणात प्रवेश -

गिजुभाईना मुलांवियी अतिशय प्रेम होते. या बालशिक्षणाकडे वळण्यासाठी एक प्रसंग कारणीभूत झाला. तो प्रसंग असा, गिजुभाई वकील होते. एक दिवस आपल्या कार्यालयात बसले असताना त्यांचे लक्ष रस्त्यावरील आरडाओरडयाने वेधले. कामात लक्ष लागेना म्हणून त्यांनी बाहेर पाहिले. एका दुकानदाराच्या मुलाला ाळेत जायचे नव्हते. मारपीट करुन जबरदस्तीने त्याचे वडील त्याला शाळेत नेत होते. बालक जागचे हालेना. रडायचे थांबेना, म्हणून मग वडिलांनी अखेर त्याचे हातपाय बांधून मुस्कट दाबून त्याला शाळेत नेले.[२]

हा प्रसंग पाहून त्यांचे मन विचाराने अस्वस्थ झाले. शेवटी गिजुभाईनी वकिली सोडली. ज्या शिक्षणाची, शाळेची ओढ मुलाला वाटत नाही उलट तेथे न जाण्यासाठी मनोभुमिका तयार होते असे शिक्षण हे शिक्षणतरी कसे म्हणावयाचे, यात काहीतरी बदल करावा असे त्यांना वाटले. आफ्रिकेत असताना त्यांनी डोरोथी फिशरने लिहिलेले मॉंटेसोरी दी मदर नावाचे पुस्तक वाचले होते. याशिवाय गोपाळदास यांचेकडून मॉन्टेसोरी पध्दतीवियीची पुस्तके मिळवून त्यांनी त्यांचा अभ्यास केला. आपल्या वीस वार्षिच्या ौक्षणिक कारकिर्दीत त्यांनी मॉन्टेसोरीचे नाव अखिल भारतीय क्षितिजावर झळकावले.

गिजुभाईचे मॉंटेसरी बालमंदिर -

मोराभाईनी सुरु केलेल्या दक्षिणमूर्ती संस्थेचे आजीवन सभासदत्व स्विकारल्यानंतर गिजुभाईनी मॉंटेसरी पध्दतीची नवीन प्रयोगशाळा काढण्याची कल्पना संस्थाचालकांपुढे मांडली. इ.स. १९१८ मध्ये गिजुभाईच्या मॉंटेसरी शळेच्या प्रयोगाला सुरुवात झाली. त्यासाठी एक भव्य इमारत त्यांच्या मित्रांनी; (श्री हरिलाल अमृतलाल शहा) बांधून दिली. या इमारतीचे उदघाटन सौ कस्तुरबा गांधी यांच्या शुभहस्ते मोठया उत्साहवर्धन वातावरणात करण्यात आले.

त्यांच्या व्यक्तिमत्वावियी त्यांच्या सहकारी ताराबाई लिहितात की, गिजुभाई असे अग्निगोलकासारखे होते त्यामुळे त्यांच्याजवळ जो कोणी जाई त्याला ते प्रज्वलित करीत. इतक्या थोडया वेळात ते इतके मोठे कार्य करु शकले ते यामुळेच. ते एक प्रखर प्रचारक होते. याचे रहस्य त्यांच्या अंतरात प्रकटलेल्या महाज्योतीत होते. ज्योतीने ज्योत प्रकटते, त्याप्रमाणे ते जेथे जात तेथे पाच-दहा मंडळींना आपला चेप लावीत. इ.स. १९२५ ते १९३९ च्या शेवटच्या चौदा वार्षि गिजुभाईनी प्रचाराचेच कार्य मुख्यत्वे केले.[३]

बालसाहित्याच्या क्षेत्रातील कार्य -

गिजुभाईनी बालशिक्षणाच्या चळवळीला एक प्रभावी सामाजिक चळवळीचे स्वरुप दिले. बालशिक्षणाची चळवळ यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नव्हते. त्यांनी माँटेसोरी बाईची तत्वे स्विकारली पण जशीच्या तशी स्विकारली नाही. त्याच शिक्षणप्रणालीला भारतीय संस्कृती, भारतीय वातावरण यांचा साज चढविला आणि तेच शिक्षण आपल्या समाजात रुचेल, पचेल अशा पध्दतीने त्यांची मांडणी केली. त्यांनी पालक, मालक, शिक्षक व समाज यांच्यासाठी विपुल लेखन केले. बालशिक्षणाविषयी पालकांमध्ये, समाजामध्ये जागत्रती व्हावी यासाठी १९२६ साली शिक्षणपत्रिका नावाचे मासिक सुरु केले. त्यांनी लोकसभा, बालकथा, बालगीते यांचा संग्रह करुन मुलांना समजेल अशा सोप्या भाोत त्यांचे प्रकाशन घडवून आणले.

गिजुभाईनी बालकांसाठी १२० पुस्तके, किशोरवयीन मुलांसाठी ६१ पुस्तके अणि शिक्षक पालक यांच्यासाठी २७ पुस्तके लिहिली त्यातील 'आई वडिलांना' व 'मातापितासे' या पुस्तकात त्यांनी आई वडिलांना वैवाहिक जीवनापासून ते मुलं मोठं होईपर्यंत त्यांचे पालनपोाण, त्यांची मानसिकता, त्याचा बुध्दिविकास, त्याच्याशी कसे वागावे ! याकरिता घरात काय काय असावे, त्याचा सन्मान कसा राखावा याविायी तळमळीने मनापासून लेखन केले ते लिहितात दृ खरे प्रेम मुलांना दागिन्यांनी सजविण्यात नाही, खरे प्रेम त्यांना चांगले पदार्थ खायला प्यायला देण्यात नाही तर खरे प्रेम त्यांना चांगले आवडीनुसार काम करू देण्यात आणि त्या कामासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आहे.४

स्वयंभू शिक्षक -

गिजुभाईनी माँटेसोरी पध्दतीचा अभ्यास करून बालशिक्षणासाठी आवश्यक साहित्य तयार केले. आपल्या वीस वार्च्या कारकिर्दीत गुजरात भाागी खेडयापाडयात सरकारचे कोणत्याही प्रकारचे उत्तेजन नसताना माँटेसोरीचा मंत्र पोहचविला. आचार्य कालेलकरांनी त्यांच्या या कार्याविषयी लिहिताना म्हटले आहे की, स्व. गिजुभाई एक स्वतंत्र शिक्षक होते त्यांची मुले अथवा माँटेसोरी ग्रंथसाहित्य ही निमित्त मात्र होती. गिजुभाईच्या अंगी असलेल्या प्रखरनिष्ठा, स्वार्थत्याग, उद्यमशिलता, योग्यता आणि प्रतिभा या गुणांमुळे बालशिक्षणाचे कार्य करू शकले. अनुताई लिहितात की, गिजुभाई गोटी फार चांगल्या सांगत. गोष्टींची नाटके करत असत. स्वत: भाग घेत. मुलांचे ते फार आवडते होते. त्यामुळे उग्र भव्य चेहरा असूनही त्यांना मिशीवाली आई म्हणून म्हणत असत.

बालमंदिराविायी भुमिका -

भारतीय बालशिक्षण, संस्थेला गिजुभाईनी बालमंदिर या नावाने सर्वप्रथम संबोधिले. गिजुभाईना माँटेसोरी पध्दतीचे नुसते अनुकरण करावयाचे असते तर त्यांनी येथील बालशिक्षण संस्थेचे बालमंदिर असे नामकरण केले. बालमंदिर वियीची भूमिका स्पट करताना ते सांगतात, बालकांचा देह लहान आहे पण त्यांचा आत्मा महान आहे. बालकांच्या देहाची वाढ होते. त्यांच्या क्ती फुलासारख्या उमलत असतात. पण त्यांचा आत्मा संपूर्ण आहे. त्या आत्म्याला आपण सन्मान द्या. त्या आत्म्याला आपण रीती व नितीने भ्रट व कलुति करता कामा नये. त्याला त्याच्या अनंत विहारात संचारता येईल असा अवकाश देवू. या कार्याला आपण निमित्त बनतो. जेथे बालकांच्या विकासाचे कार्य चालले आहे ती ठिकाणे बालमंदिर आपण आपली तीर्थक्षेत्रे समजू या. तीच आपली देवमंदिरे समजु या.[५]

नुतन बाल शिक्षण संघाची स्थापना-

बालशिक्षणाच्या प्रचाराचे कार्य एकटयाने करण्यापेक्षा एखाद्या संस्थेच्या द्वारे व्हावे असे गिजुभाईना वाटले आणि त्यांनी नूतन बाल शिक्षण संघाची स्थापना केली. सदैव जीवंत शिक्षणपध्दती आचरण्याचा संघ या अर्थाने या संघटनेचे नाव नुतन बाल शिक्षण संघ ठेवण्यात आले. या संघाच्या प्रथम अध्यक्षा म्हणून श्रीमती सरलादेवी साराभाई यांनी भुावून २५ वर्षापर्यंत ही जबाबदारी समर्थपणे पार पाडली. गिजुभाई संघाचे चिटणीस तर ताराबाई या सहचिटणीस होत्या.

राट्रीय शिक्षणाशी सुसंगती-

गिजुभाईच्या मनावर त्यांचे मामा मोटाभाई यांच्या धार्मिक व आध्यात्मिक जीवनाचा प्रभाव दिसून येतो. राट्रीयतेच्या विचारांनी गिजुभाईच्या अंतकरणाचा ठाव घेतला होता. बालमंदिराची चळवळ ही जनतेचीच चळवळ आहे असे ते मानत होते. ते एका ठिकाणी म्हणतात, जनता म्हणजे प्रजासमूह, लोकसमूह म्हणजे माता पिता आणि मुले, मातापित्यांचे सर्वस्व म्हणजे त्यांची प्रिय मुले अथवा बालके. या बालकासाठी मरणे व जगणे म्हणजे जनतेसाठीच जगणे व मरणे नव्हे का ? बालकांच्या सर्व ाक्तीचा विकास करणे म्हणजे जनतेची उन्नती, साधना नव्हे का? तसेच ते पुढे सांगतात की, आपण म्हणजे आपली खेडी. खेडयांच्या शिक्षणाचा जो मार्ग तोच आपल्या राट्रजीवनाचा मार्ग आहे. बालजीवनाच्या विकासाचा प्रश्न सोडविण्यासाठी आपण माँटेसोरीला तेथे घेवून जावू.[६]

सारांश -

बालशिक्षणातील गिजुभाईच्या कार्याचे मोल हे निदान भारतात तरी अनमोल आहे. या कार्याची माहिती करून घेणे, त्यांना विनम्र अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे. या दिव्य बालशिक्षण ज्योतीचा अंत त्यामानाने फारच लवकर झाला. वयाच्या ५४ व्या वर्षी २६ जून १९३९ रोजी मुंबई येथे ही ज्योत मावळली. एक मात्र खरे की त्यांनी सुरू करून दिलेला बालशिक्षणाचा प्रवास मात्र अखंडपणे चालू राहिला.

संदर्भसूची-

१. प्रा. पानसे रमेश (संपा.); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशुविहार मंडळ प्रकाशन, दादर,१९९७ पृष्ठ क्रं.८०.

२. दाते रजनी; गिजुभाई बधेका यांचे बालशिक्षणवियक विचार, बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र पुणे २००६ पृष्ठ क्रं.२२.

३. प्रा. पानसे रमेश (संपा.); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशुविहार मंडळ प्रकाशन, दादर,१९९७ पृष्ठ क्रं.८२.

४. सौ. दाते रजनी; गिजुभाई बधेका यांचे बालशिक्षणवियक विचार, बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र पुणे २००६ पृष्ठ क्रं.२३.

५. श्री. पानसे रमेश (संपा.); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशुविहार मंडळ प्रकाशन, दादर,१९९७ पृष्ठ क्रं.८७

६. प्रा. पानसे रमेश (संपा.); बालकेंद्री शिक्षण व बालशिक्षणाचा भारतीय इतिहास, शिशुविहार मंडळ प्रकाशन, दादर,१९९७ पृष्ठ क्रं.८८.